**महाराष्ट्र शासन**

## आदिवासी विकास विभाग

अर्जदाराचा
नजिकच्या
काळातील
पासपोर्ट साईज
फोटो

**सांकेतांक क्रमांक**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

**अर्ज क्र. .........**

# वसतीगृह प्रवेश अर्ज

आदिवासी विकास आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नाशिक संचलित
शासकीय वसतिगृह आवेदन पत्र

**अनुसूचित जाती**
**अनुसूचित जमाती** **(नविन प्रवेशार्थी)**
**विमुक्त जाती व भटक्या जमाती** **(जुने प्रवेशार्थी)**

प्रति,
गृहप्रमुख / गृहपाल
शासकीय मुलांचे / मुलींचे वसतिगृह ------------------- तालुका ----------- जिल्हा ---------------
महोदय / महोदया,

मी आपल्या वसतिगृहात प्रवेश मिळवू इच्छितो / इच्छिते, प्रवेशपत्रिकेत दिलेला तपशिल, माझ्या माहितीनुसार दिला आहे. मला वसतिगृहात प्रवेश मिळाल्यानंतर मी सोबत जोडलेल्या शासकीय वसतिगृह नियमावलीचे (शिस्त, वर्तणुक, अभ्यासातील प्रगती इ.) कसोशीने पालन करीन, असे आश्वासन देतो / देते. प्रवेश पत्रिकेत दिलेली माहिती चुकीची असल्यास अगर गैरशिस्त वर्तणूक आढळून आल्यास मला केव्हाही वसतिगृहातून काढून टाकण्यात येईल याची मला जाणीव आहे.

स्थान --------------------------------- आपला / आपली विश्वासु,

दिनांक - अर्जदार विद्यार्थ्याची / विद्यार्थीनीची सही

**अर्जदाराने भरावयाची माहिती**

१. पूर्ण नांव (प्रथम आडनाव) ----------------------------------------------------------------------
२. सध्याचा संपूर्ण पत्ता ठिकाण-------------- पोस्ट ------------- तालुका ------------------
जिल्हा ---------------
३. कायम रहात असलेल्या ठिकाणाचा पत्ता ठिकाण --------------पोस्ट ------------
तालुका------------ जिल्हा ----------------
४. जन्मस्थळ (ठिकाण, तहसील, जिल्हा) ठिकाण -------------पोस्ट------------तालुका-----------
जिल्हा------------
५. जन्म दिनांक --------------------------------------------------------------------------------------
६. धर्म आणि जात : धर्म ---------------- जात ------------------

* जातीचा दाखला जात प्रमाणपत्र तपासणी समितीकडुन तपासुन घेतला आहे काय ?
होय / नाही

असल्यास प्रमाणपत्र क्र. ---------------------- दिनांक --------------------
(वेतनीय किंवा मानसेवी दंडाधिकारी यांच्या दाखल्यासह)

७. विवाहित / अविवाहित :

८. अर्जदार हा मुलगा / मुलगी आहे:

९. यापूर्वी शासकीय वसतिगृहात
रहात असल्यास, वसतिगृहाचे नाव : -----------------------------------------------------------------
-

१०. अशा वसतिगृहात राहण्याचा कालावधी : ------------------------------------------------------------
-

११. पूर्वी रहात असलेले वसतीगृह सोडण्याचे कारण ------------------------------------------------

१२. नेहमीच्या अभ्यासक्रमाच्या व्यतिरिक्त ---------------------------------------------------------
दिलेल्या परीक्षा

१३. चालू वर्षी अर्जदारास कोणत्या इयत्तेत प्रवेश पाहिजे.---------------------------------------------

१४. मागील वर्षातील वार्षिक परिक्षेत मिळालेल्या गुणांची टक्केवारी :-
एकूण गुण ............ पैकी प्राप्त गुण ........... व टक्केवारी............
परिक्षेचा निकाल - नापास / पास
(गुणपत्रिकेची सत्यप्रत अर्जासोबत जोडावी.)

(आवश्यक नसेल ते खोडावे)

**अर्जदार विद्यार्थ्याविषयी शिक्षण संस्था प्रमुखांनी द्यावयाची माहिती**

१५. वार्षिक परीक्षा उत्तीर्ण झाल्याचा दिनांक -----------------------------------------------------------

१६. वार्षिक परीक्षेत मिळालेले विषयवार गुण

| अ.क्र. | विषय | पैकी | मिळालेले गुण | उत्तीर्ण होण्याचा क्रमांक व गुणांची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |
| ७ | | | | |
| ८ | | | | |
| ९ | | | | |
| १० | | | | |
| | एकूण : | | टक्केवारी | |

१७. आपल्या संस्थेत प्रवेश घेण्यापुर्वी ---------------------------------------------------
अर्जदार विद्यार्थ्याने कोणत्या शिक्षण
संस्थेत शिक्षण घेतले आहे?

१८. अर्जदारास शिष्यवृत्ती मिळत होती काय? -----------------------------------------------------
असल्यास कोणती व किती?

१९. अर्जदाराचे चारित्र्य, बुध्दीमत्ता याविषयीचे ---------------------------------------------------
सर्वसाधारण मत.

२०. शिफारस ---------------------------------------------------

स्थान ------------------

दिनांक ----------------

**संस्थाप्रमुखांची सही व शिक्का**

## कुटुंबप्रमुखाने द्यावयाची माहिती

२१. (अ) वडील हयात असल्यास त्यांचे संपूर्ण नांव : -----------------------------------------------

(ब) वडील हयात नसल्यास कायदेशीर -----------------------------------------------------------
पालकाचे नाव

(क) विद्यार्थीनीचे लग्न झालेले असल्यास ---------------------------------------------------------
तिच्या पतीचे संपूर्ण नांव

२२. वडील / पालकांचा / पतीचा व्यवसाय ---------------------------------------------------------------

२३. वडील / पालकांचा / पतीचा संपूर्ण पत्ता -----------------------------------------------------------

२४. वडील / पालकांचे वार्षिक उत्पन्न रुपये -----------------------------------------------
मामलेदारांच्या / मानसेवी दंडाधिकारी यांच्या
दाखल्यासह (आर्थिकदृष्टया मागासलेल्या
विद्यार्थ्यांसाठी तहसिलदाराचा दाखला
आवश्यक आहे).

२५. कुटूंबातील व्यक्तींची माहिती.

| अ.क्र. | व्यक्तीचे नांव | अर्जदाराशी नाते | व्यवसाय | शिक्षण घेत असल्यास शासकीय वसतिगृहात २०० - २०० या सालात प्रवेशासाठी अर्ज केला आहे काय? |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

२६. संबंधित शासकीय वसतिगृहाच्या गृहपालांकडे अर्ज सादर केल्याचा दिनांक ......... ........... अर्जदार विद्यार्थ्यास वसतिगृहात प्रवेश मिळाल्यास वसतिगृहामार्फत मिळणा-या सर्व वस्तूस मी जबाबदार राहीन. त्या विद्यार्थ्यांकडून सामानाची मोडतोड किंवा सामान हरविल्यास त्या वस्तुंची योग्य किंमतीनुसार भरपाई केली जाईल (योग्य ती किंमत वसतिगृहाच्या अधिका-यांकडून ठरविली जाईल.) विद्यार्थ्याने गैरवर्तणूक केली किंवा वसतिगृहाच्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्यास वसतिगृहातून नोटीस न देता काढून टाकण्यास माझी हरकत नाही. माझे वार्षिक उत्पन्न सर्व मार्गांनी मिळून रुपये .............. (अक्षरी रुपये..........................................) आहे.

स्थळ :

दिनांक :

पालकाची स्वाक्षरी

साक्षीदारांची नावे व पत्ताः साक्षीदारांच्या सहया

(१)

(२)

**टीप :**

(१) प्रवेश अर्जातील माहिती संपूर्णरित्या भरली नसेल तर प्रवेशअर्ज विचारात घेतला जाणार नाही.

(२) प्रवेशअर्ज दिलेल्या मुदतीत वसतिगृह कार्यालयात पोहोचला पाहिजे. उशीरा आलेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

(३) वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यास प्रत्येक विद्यार्थ्यास वैयक्तिक कळविले जाणार नाही.

## शासकीय वसतिगृहाचे नियम

१. शिक्षण संस्था आणि वसतिगृहात वसतिगृह प्रमुखाच्या पूर्वसंमतीशिवाय विद्यार्थ्याला / विद्यार्थिनीला अनुपस्थित राहता येणार नाही.

२. वसतिगृह प्रमुखाच्या पूर्वसंमतीशिवाय शाळा कॉलेजच्या वेळेव्यतिरिक्त विद्यार्थी / विद्यार्थिनींनी वसतिगृहाचे बाहेर जाऊ नये.

३. वसतिगृहातर्फे देण्यात आलेले साहित्य काळजीपूर्वक वापरावे व शैक्षणिक वर्षाअखेरीस सुस्थितीत परत करावे. हरविलेल्या किंवा निकामी केलेल्या वस्तूची योग्य ती किंमत भरुन देण्याची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्याची राहील. ही बाब तपासल्याशिवाय वसतिगृहाकडे जमा

असलेली अनामत रक्कम परत दिली जाणार नाही. साहित्य व्यवस्थित परत न केल्यास विद्यार्थ्यास पुढील शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृहात प्रवेश दिला जाणार नाही. त्याचप्रमाणे ही बाब त्यांचे शिक्षण संस्थांना कळविली जाईल.

४. विद्यार्थ्याला वसतिगृहातर्फे दिलेल्या आणि त्याच्या स्वतःच्या वस्तू सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पूर्णपणे विद्यार्थ्याचीच राहील.

५. शैक्षणिक वर्षातील सर्व परीक्षांना विद्यार्थ्यांनी बसले पाहिजे.

६. अभ्यासातील प्रगती समाधानकारक असली पाहिजे. तिमाही, सहामाही यासारख्या परीक्षेमध्ये कोणतेही सबळ कारण नसल्यास किमानपक्षी एकंदर ५० टक्के गुण असावेत. वार्षिक परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्यास विद्यार्थ्यास वसतिगृहात राहता येणार नाही.

७. प्रामुख्याने वसतिगृह, खोल्या, नीटनेटक्या आणि स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील. वसतिगृह प्रमुखाचे परवानगीशिवाय खोल्या आणि खोल्यातील साहित्याची मांडणी विद्यार्थ्यांना बदलता येणार नाही.

८. विद्यार्थ्यांच्या मित्रमंडळींना, नातेवाईकांना वसतिगृहात राहता येणार नाही.

९. विद्यार्थ्यांनी आपली वर्तणूक वसतिगृहात व वसतिगृहाबाहेर सौजन्यशील ठेवावी. चळवळ,संप, अन्नसत्याग्रह अथवा तत्सम प्रकारामध्ये छात्रांना सहभागी होता येणार नाही. तसेच वसतिगृह प्रतिष्ठेला बाधक होईल असे कोणतेही वर्तन करता येणार नाही.

१०. वसतिगृह व्यवस्थेत काही अडचण आल्यास वसतिगृह प्रमुखांच्या मदतीनेच ती सोडविली पाहिजे. गंभीर स्वरुपाचे अन्याय होत आहे असे वाटत असल्यास वसतिगृह प्रमुखांच्या वरिष्ठ अधिका-यांकडे दाद मागता येईल.

११. स्थानिक परिस्थितीनूसार वसतिगृह प्रमुख विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन वेळोवेळी जे नियम करतील ते विद्यार्थ्यांवर बंधनकारक राहतील.

१२. वसतिगृहातील भोजनपध्दती नुसार आहार घेणे हे प्रत्येक विद्यार्थ्यावर बंधनकारक राहील.

१३. विद्यार्थ्याच्या प्रकृतीत बिघाड झाल्यास त्या बाबत वसतिगृह प्रमुखांना ताबडतोब कळविले पाहिजे आणि औषधोपचार वसतिगृह प्रमुखांनी सांगितलेल्या किंवा अंशकालीन वैद्यकीय अधिका-याकडून प्रथम करुन घेण्यात यावा.

१४. शिधा नियंत्रण पध्दती ज्या ठिकाणी अस्तित्वात आहे अशा ठिकाणी वसतिगृहात प्रवेश घेतेवेळी पूर्वीच्या रेशनकार्डात नांव कमी केल्याबाबतचा दाखला आवश्यक आहे.

१५. निवड झालेल्या विद्यार्थ्यास प्रवेश घेतेवेळी वैद्यकीय दाखला सादर करावा लागेल.

## मुलींच्या वसतिगृहासाठी पुरवणी नियम

१. प्रत्येक विद्यार्थीनीने सायंकाळी ७.३० चे आत वसतिगृहात परत आलेच पाहिजे.

२. कोणत्याही कार्यक्रमास जाण्यास सायंकाळी ७.३० नंतर परवानगी देण्यात येवू नये.

३. विद्यार्थीनींना घरी जाण्यास सुट्टी देण्यापूर्वी त्यांच्या स्थानिक पालकांकडून अर्ज घ्यावा. त्यासोबत वसतिगृहातून जाण्याची तारीख व वेळ, त्याचप्रमाणे येण्याची तारीख व वेळ लिहून घ्यावी.

४. मुलींना महिन्यातून एकदाच स्थानिक पालकांचे घरी जाण्याची परवानगी देण्यात येईल.

५. मुलींना वसतिगृहातील दुरध्वनीचा उपयोग करता येणार नाही.

६. मुलींना आलेली पत्र अधीक्षिका यांनी वाचल्याशिवाय देवू नये.

७. विद्यार्थीनींना भेटावयास येणा-या मित्रमैत्रिणी व नातेवाईकांची रजिस्टर मध्ये नोंद ठेवावी. कोणत्या लोकांना भेट द्यावी व कोणास भेट देवू नये. याबाबत गृहपालांना निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार आहे.

८. वसतिगृहात मुलींच्या नातेवाईकांना अगर मैत्रिणीला राहण्यास परवानगी देण्यात येवू नये.

९. ज्या मुलीचे वर्तन नियमाविरुध्द अगर आक्षेपार्ह आहे अशा मुलींबद्दल सविस्तर अहवाल आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक किंवा अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे/नाशिक/अमरावती व नागपुर यांच्याकडे पाठवावा.

---

### कार्यालयीन कामकाजास्तव

१. अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक

२. अर्जासोबत सर्व आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली आहेत काय? व अर्ज परीपूर्ण आहे काय?

३. अर्ज निवड समितीपुढे ठेवल्याचा दिनांक

४. अर्जदार विद्यार्थ्यास निवड समितीने निवड केली किंवा नाही? होय / नाही

| गृहप्रमुख/गृहपाल | सहाय्यक प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | प्रकल्प अधिकारी<br>एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प |
|---|---|---|

५. विद्यार्थ्यास वसतिगृहात प्रवेश दिल्याचा दिनांक

गृहपालाची सही